# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र. विकमं/२०१३–१४/२१९ दिनांक : ३१/०७/२०१३.

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक,**

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व

महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:– महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेसंबंधी......**

महोदय /महोदया,

पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांनी सन २०१२–२०१३ मध्ये प्रकाशित केलेल्या नियतकालिकाची स्पर्धा पुणे विद्यापीठाच्यावतीने आयोजित करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येतील.

| जिल्हास्तर (प्रत्येकी) (पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर, नाशिक) | विद्यापीठस्तर |
|---|---|
| प्रथम क्रमांक : रु. ७,०००/– | प्रथम क्रमांक : रु. १५,०००/– |
| द्वितीय क्रमांक : रु. ६,०००/– | द्वितीय क्रमांक : रु. १२,०००/– |
| तृतीय क्रमांक : रु. ५,०००/– | तृतीय क्रमांक : रु. १०,०००/– |
| | चतुर्थ क्रमांक : रु. ०८,०००/– |

आपणांस विनंती करण्यात येत आहे की, सन २०१२–२०१३ या वर्षामध्ये आपल्या महाविद्यालयाने/मान्यताप्राप्त संस्थेने प्रकाशित केलेल्या **नियतकालिकाच्या दोन प्रती सोमवार, दिनांक १६ सप्टेंबर, २०१३ पूर्वी** विद्यार्थी कल्याण मंडळाकडे पाठवाव्यात.

स्पर्धेच्या संदर्भात मा. कुलगुरु यांनी नियुक्त केलेल्या परीक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

(डॉ. पंडित एन. शेळके)

संचालक,

विद्यार्थी कल्याण मंडळ


**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे – ४११ ००७.**

☎ ०२० – २५६०११५४ फॅक्स : ०२० – २५६०११५४ मोबाईल : ९८५०१७६५७५